स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in
Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/ए-१ गोपनीय/प्रा.प./ 870
कोल्हापूर-४१६ ००४
दिनांक - ०५.०७.२०२३

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

**विषय** : - माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा जुलै - ऑगस्ट २०२३ तोंडी, श्रेणी व प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य वितरण व गुणतक्ते भरण्याबाबतच्या सूचना.

**संदर्भ** : - राज्यमंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा - ६ / २३८८ दिनांक -०६/०६/२०२३ चे पत्र.

या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा जुलै -ऑगस्ट २०२३ ला प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या भाषा, समाजशास्त्र विषयाच्या तोंडी परीक्षा तसेच विज्ञान प्रात्यक्षिक, तंत्र व पूर्व व्यावसायिक, नवीन, पूर्व व्यावसायिक, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र या विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा व अंतर्गत मुल्यमापनाची परीक्षा मंगळवार दिनांक - १८/०७/२०२३ ते मंगळवार दिनांक ०१/०८/२०२३ या कालावधीत आयोजित करण्यात येत आहे. विभागीय मंडळामार्फत **प्रात्यक्षिक/अंतर्गत मुल्यमापन परीक्षेच्या साहित्याचे वाटप मंगळवार दिनांक ११/०७/२०२३ रोजी संबधित वितरण केंद्रावर सकाळी १०.००ते सायं ४.०० या वेळेत करण्यात येणार आहे याची सर्व शाळा प्रमुखांनी नोंद घ्यावी.**

**गुणतक्ते भरण्याबाबतच्या व मंडळास सादर करण्याबाबतच्या सूचना**

जुलै २०२३ ची शास्त्र प्रात्यक्षिक परीक्षा केंद्रस्थळी होत असल्यामुळे प्रात्यक्षिक परीक्षेचे गुणतक्ते केंद्रशाळेकडे देण्यात आलेले असून विद्यार्थ्यांना केंद्रस्थळी शास्त्र परीक्षा घेणार असल्यामुळे प्रात्यक्षिक परीक्षेच्या निश्चित वेळेबाबत केंद्र शाळेकडून माहिती घेवून परीक्षा देणेबाबत विद्यार्थ्यांना कळविण्यात यावे व आपणही केंद्रशाळेशी संपर्क साधून प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळेचे निश्चितीकरण करुन विद्यार्थ्यांना त्याबाबत कळविण्यात यावे, जेणे करून विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षा देणे सुलभ होईल.

तंत्र व पूर्व व्यावसायिक प्रात्यक्षिक परीक्षा, नवीन पूर्व व्यावसायिक विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा व अंतर्गत मुल्यमापन परीक्षा आपल्या शाळेत होत असल्यामुळे या विषयाचे गुणतक्ते आपल्या शाळेस देण्यात येत असून ते नेहमीप्रमाणे OMR पध्दतीचे असल्यामुळे त्या अनुषंगाने भरण्यात यावेत.

१) प्राप्त गुण बैठक क्रमांक (Seat No) समोर दिलेल्या चौकटीतच सुवाच्य अक्षरात भरावे व त्या अनुषंगाने समोरील OMR चे वर्तुळ काळया/निळया (Bule/Black) शाईने भरावे.
२) बारकोडवर काहीही लिहू नये. तसेच सही करू नये.
३) सदर OMR शीटला फोल्ड/स्टेपल करू नये.
४) गुणपत्रिका (Marklist) भरताना OMR चे वर्तुळ भरलेले आहे व खाली Page Total केलेली आहे याची खातरजमा करून घेण्यात यावी.
५) सदर देण्यात येणाऱ्या OMR पध्दतीच्या गुणपत्रिकेमध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड करू नये.
६) गुणपत्रिकेमध्ये असलेल्या छापील बैठक क्रमांकाची एकूणातील गुणात नोंद घ्यावी. गुणपत्रिकेमध्ये अतिरिक्त बैठक क्रमांक अथवा विषय बदल घेवून प्रविष्ठ होणाऱ्या बैठक क्रमांकाची नोंद करून स्वतंत्ररित्या गुणतक्ते वरील गुणतक्त्या सोबत पाठविण्यात यावेत.

| माध्यमिक शाळा क्रमांक | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | विषयाचे नाव | विषय सांकेतीक क्रमांक | बैठक क्रमांक | मिळालेले गुण | |
| | | | | अंकात | अक्षरात |

१) वरील प्रमाणे गुणतक्ते भरण्याची कार्यवाही करावी.

२) पूर्व व्यावसायिक परीक्षा, अंध व अपंगासाठी कार्यानुभव, तंत्र व पूर्व व्यवसायिक प्रात्यक्षिक परीक्षा गुणतक्ते साहित्याचे वाटपावेळी करण्यात येईल तसेच अंतर्गत मुल्यमापन व प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य परीक्षा झाल्यानंतर शाळानी वितरण केंद्रावर गुरूवार दिनांक ०३/०८/२०२३ रोजी न चुकता जमा करावयाचे आहे.

३) केंद्रशाळेने त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या शाळेची विज्ञान विषयाचे गुणतक्ते व उत्तरपत्रिका यांचे एक पाकिट करावे व सदरचे साहित्य केंद्र शाळेनी गुरूवार दिनांक ०३/०८/२०२३ रोजी संबधित वितरण केंद्रावर न चुकता जमा करण्यात यावे.

४) परीक्षेचा कालावधीत मर्यादित असल्याने या परीक्षेसाठी प्रात्यक्षिक , तोंडी व श्रेणी परीक्षा आणि अंतर्गत मुल्यामापन परीक्षा आऊट ऑफ टर्न ने आयोजित करण्यात येणार नाही.

श्री. डी.एस.पोवार
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी

**१. प्रात्यक्षिक परीक्षा केंद्र शाळा संचालक**

यांना कळविण्यात येते की त्यांच्या केंद्रअंतर्गत येणाऱ्या शाळांची नांवे व दुरध्वनी क्रमांकाची यादी सोबत देण्यात आलेली असून आपल्या केंद्रावर प्रात्यक्षिक परीक्षेची तारीख व वेळ संबंधित शाळांना कळवून विद्यार्थी प्रात्यक्षिक परीक्षेस उपस्थित ठेवण्याबाबत संबंधितांना कळविण्यात यावे तसेच या परीक्षेसाठी केंद्रशाळांनी मार्च २०२३ परीक्षेस नियुक्त केलेल्या अंतर्गत परीक्षकांची नियुक्ती करुन परीक्षा घेण्यात येवून प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य जिल्हा वितरण केंद्रावर दिनांक ०३/०८/२०२३ रोजी जमा करावे.

**केंद्र प्रमुखांसाठी महत्वाचे**
**केंद्र प्रमुखांना प्रात्यक्षिक परीक्षा नियोजीत वेळेत घेणेबाबत अडचण असल्यास मंडळ कार्यालयाशी संपर्क साधून परीक्षेबाबत मंडळाचे पुढील कार्यवाहीबाबत आदेश घ्यावेत.**

**२. जिल्हा वितरण केंद्र प्रमुख ,**

यांना कळविण्यात येते की मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या परीक्षा पूर्व साहित्याचे दिनांक ११/०७/२०२३ रोजी संबंधित शाळा व केंद्र शाळांना वितरण करण्यात यावे. परीक्षा पूर्ण झाल्यानंतर परीक्षोत्तर साहित्य दि. ०३/०८/२०२२ रोजी स्विकारावे व मंडळ कार्यालयास आपल्या प्रतिनीधीमार्फत दिनांक ०४/०८/२०२३ रोजी जमा करण्याची दक्षता घ्यावी.